जागतिक बँक सहाय्यित औद्योगिक मूल्य वृध्दीकरणासाठी कौशल्याचे बळकटीकरण करणे या केंद्रीय योजनेंतर्गत वित्तिय वर्ष २०२०-२१ करीता प्रतिबिंबित करण्यात आलेल्या तरतूदीमधून रु. १००.०० लाख निधी वितरीत व खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
शासन ज्ञापन क्रमांक : स्ट्राइव्ह-२०२०/प्र.क्र. ११०/व्यशि-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ जुलै, २०२०.

संदर्भ : १) शासन निर्णय,वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १७.०४.२०१५
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दि. ०८.०७.२०१९
३) शासन निर्णय क्र. :जाबँप्र-२६११/प्र.क्र.१८/१९/व्यशि-५ दि. २२.०८.२०१९
४) शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१९/प्र.क्र.१५६/व्यशि-३ दि. १९.०९.२०१९
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दि. २२.०१.२०२०
६) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक का.१८/STRIVE/४०२०२०/४४, दि. २०.०३.२०२०
७) शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२० /प्र.क्र.६५/अर्थ-३ दि. ०४.०५.२०२०

ज्ञापन : जागतिक बँक सहाय्यित औदयोगिक मूल्य वृध्दीकरणासाठी कौशल्याचे बळकटीकरण योजना (STRIVE) ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यास संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सन २०२२ या वर्षीपर्यंत करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास २४०.०० लाख निधी वितरीत करण्यात आलेला आहे. याअनुषंगाने स्ट्राईव्ह या योजनेंतर्गत कामे करण्यास प्रशासकीय मंजूरी व निधी वितरीत करण्यास संदर्भ क्र. ६ येथील पत्रान्वये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी शासनास विनंती केलेली आहे.

२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिकाऊ उमेदवारी यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाची प्रासंगिकता व कार्यक्षमता वाढविणे या केंद्र पुरस्कृत कार्यक्रम खर्चाच्या योजनेकरीता सन २०२०-२१ च्या अर्थ संकल्पात रु. ७० कोटीची मूळ तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. वित्त विभागाच्या दि. ०४.०५.२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यक्रम अंतर्गत योजनांकरीता सन २०२०-२१ या वर्षाकरीता ३३% उपलब्ध निधीच्या अधीन राहून रु. १००.०० लाख (अक्षरी रुपये शंभर लक्ष फक्त) निधी खर्च करण्यास या ज्ञापनाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

D-18
1017
15/7/20

३. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उदयोजकता मंत्रालयाने दि. ०३.०१.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या Operations Manual मधील मार्गदर्शक सूचनांनुसार नमूद केलेली कामे तसेच चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर, औरंगाबार या Industry Cluster च्या प्रस्तावाला

राज्य सुकाणू समितीच्या मंजूरीच्या अधीन राहून Operation Manual मधील मार्गदर्शक सुचनांनुसार खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर मंजूर करण्यात येत असलेला रु. १००.०० लाख वितरीत निधी मागणी "मागणी क्र.झेड ए २,२२३० कामगार व सेवायोजन,१०१, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,(०१) औद्योगिक मूल्य वृध्दीकरणासाठी कौशल्याचे बळकटीकरण करणे (STRIVE) (०१)(०२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिकाऊ उमेदवारी यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाची प्रासंगिकता व कार्यक्षमता वाढविणे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)(कार्यक्रम) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२३०ए ३५२)" या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदींमधून भागविण्यात यावा. उपरोक्त खर्चाची अनुज्ञेयता तपासण्याची जबाबदारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची राहील.

५. सदर ज्ञापन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अनुसार वित्तीय अधिनियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग दोन मधील अनुक्रमांक ३, नियम क्रमांक ७; अ.क्र. ४, नियम क्र. ७; अ.क्र. २७-अ, नियम क्र. ७६ व अ.क्र. २८ नियम क्र.७६,अ.क्र.३७ नियम क्र. ९० अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या अनौसं.९३/२०२०/व्यय-६ दि.१७.०६.२०२० रोजीच्या व नियोजन विभागाच्या दि.२०.०५.२०२० च्या मंजूरी अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विनोद बोंदरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सह सचिव/उप सचिव कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
७. कक्ष अधिकारी, रोस्वरो-२, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, (संचालनालयामार्फत).
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत).
१३. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, (संचालनालयामार्फत)
१४. निवड नस्ती (व्यशि-३), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

D:\२०२०\ज्ञापन\स्ट्राईव्ह योजनेकरीता २.४० लाख निधी वितरीत करणेबाबत फायनल.docx